PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 6, ISSUE 1

# चंद्रपूर शहरातील उच्च प्राथमिक स्तरावर मराठी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या दारिद्र्य रेषेखालील अमराठी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास

**डॉ. एस. एन. बरडे**
सहयोगी प्राध्यापक
जनता शिक्षण महाविद्‌यालय चंद्रपूर
**(महाराष्ट्र) भारत**

## प्रास्ताविक :

भारतीय राज्यघटनेनुसार धर्मनिरपेक्षतेचे तत्व स्विकारल्या गेल्यामुळे सर्वच धर्मांचे लोक इथे गुण्या–गोविंदाने अनेक वर्षांपासून राहात आहेत. सर्वच समुदायातील लोकांच्या पाल्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. शिक्षणाचा अधिकार ही संकल्पना आता मान्य पावली आहे. भारतीय समाजामध्ये हिंदु सोबतच मुस्लीम, शिख, खिश्चन, पारसी इ. समुदायाचे लोकांना समप्रमाणात अधिकार प्राप्त झालेले आहेत. महाराष्ट्र हे मराठी भाषिक राज्य असले तरी अर्थार्जनासाठी बाहेरील राज्यातून आलेले अनेक कामगार येथे वास्तव्यास आहेत. त्यामुळे त्यांची मुले आपल्या राज्यातील अनेक शाळांमधून शिक्षण घेत आहे. संशोधक हे स्वतः शिक्षण महाविद्यालयात कार्यरत असल्यामुळे आंतरवासिता कार्यक्रमां अंतर्गत अनेक शाळांना भेटी देतांना दारीद्रय रेषेखालील अमराठी विद्यार्थी जे की मराठी माध्यमांच्या शाळेत शिक्षण घेत होते. त्यांच्या संदर्भात संशोधकाला समस्या जाणवल्या. या समस्यांच्या समाधानार्थ संशोधकाने प्रस्तुत विषयावर संशोधन करण्याचे ठरविले. दारीद्रय रेषेखालील अमराठी विद्यार्थ्यांच्या बऱ्याच समस्यांची संशोधकाला प्रचिती आली, त्यामुळे संशोधनाचे प्रयोजन.

संशोधन विषयाचे शीर्षक :

"चंद्रपूर शहरातील उच्च प्राथमिक स्तरावर मराठी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या दारीद्रय रेषेखालील अमराठी विद्यार्थ्यांच्या समस्यांचा अभ्यास "

संशोधनाची उद्दीष्टे :

(1) चंद्रपूर शहरातील उच्च प्राथमिक स्तरावर मराठी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या दारीद्रय रेषेखालील अमराठी विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक व आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.

(2) चंद्रपूर शहरातील उच्च प्राथमिक स्तरावर मराठी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या दारीद्रय रेषेखालील अमराठी विद्यार्थ्यांना भेडसाविणाऱ्या शैक्षणिक समस्यांची उकल करणे.

(3) चंद्रपूर शहरातील उच्च प्राथमिक स्तरावर मराठी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या दारीद्रय रेषेखालील अमराठी विद्यार्थ्यांना भेडसाविणाऱ्या समस्यांवर उपाय सुचविणे.

संशोधनाची गरज व महत्व :

बऱ्याच अमराठी लोकांना भाषेसंदर्भात समस्या जाणवतात. त्यांच्या पाल्यांना ते आर्थिक कारणांमुळे उच्च दर्जाच्या शाळांतून शिक्षण देवू शकत नाही त्यामुळे बरेचदा स्थानिक मराठी शांळामध्ये नाईलाजास्तव त्यांच्या पाल्यांना प्रवेश घ्यावा लागतो. संशोधकाला आंतरवासिता कार्यक्रमांतर्गत मुख्याध्यापकांशी, शिक्षकांशी चर्चा करतांना या विद्यार्थ्यांच्या अनेक समस्या असल्याचे जाणवले. संबंधित विषयावर संशोधन करण्याअगोदर संशोधकाने या विषयाशी संबंधित झालेल्या इतर संशोधनांचा आढावा घेतला. परंतु फार कमी संशोधने या विषयासंदर्भात झाल्याचे आढळले. त्यामुळे या संशोधनाची आवश्यकता भासली हेच संशोधनाचे वेगळेपण आहे.

**कार्यात्मक व्याख्या** :

**चंद्रपूर भाहर** :— महाराष्ट्रातील विदर्भ भागातील पूर्वेला असलेले चंद्रपूर जिल्ह्यातील शहर.

**उच्च प्राथमिक स्तर** :— इ. 6 वी ते इ. 8 पर्यंतचे वर्ग.

**मराठी माध्यम** :— महाराष्ट्र राज्यातील शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मराठी या प्रथम भाषेचे (मातृभाषा) माध्यम.

दारीद्रय रेषेखालील (Below Poverty line)

Wikipedia नुसार " Below poverty line is a bench mark used by the government of India to indicate economic disadvantage and to identify individuals and households in need of government assistance and aid. It is determined using vision parameters which vary from state to state and withen state.

**अमराठी विद्यार्थी** : ज्या विद्यार्थ्यांत मराठी भाषा नीट बोलता येत नाही असे विद्यार्थी, जे की ज्यांचे पालक इतर राज्यातुन आलेले आहेत.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा** :

प्रस्तुत संशोधन हे चंद्रपूर जिल्ह्यातील चंद्रपूर शहरापुरतेच मर्यादीत असून प्रस्तुत संशोधनासाठी चंद्रपूर शहरातील चांदा शिक्षण प्रसारक मंडळ, द्वारा संचालित तीन जनता विद्यालयातील उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचाच विचार करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधनात दारीद्र्य रेषेखाली मोडणाऱ्या अमराठी विद्यार्थ्यांचाच जे की मराठी माध्यमातून शिक्षण घेत आहेत त्यांच्या समस्याबाबत विचार करण्यात आला आहे.

**जनसंख्या व** न्यादर्श :

चंद्रपूर शहरातील सर्व उच्च प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा जनसंख्या संबोधण्यात आल्या व चांदा शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित तीन जनता विद्यालयातील एकूण 120 विद्यार्थ्यांचा न्यादर्श घेण्यात आला.

**संशोधन पद्धती व साधने** :

संबंधित संशोधनाचे तथ्य संकलनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला. निरीक्षण प्रश्नावली व मुलाखत या साधनांचा वापर करून संशोधनासाठी आवश्यक तथ्ये संकलीत करण्यात आली.

**संशोधन कार्यपद्धती** :

संशोधन उद्दीष्टांनुसार संशोधकाने आवश्यक ती माहीती गोळा करण्याकरिता विद्यार्थ्यांसाठी, शिक्षकांसाठी प्रश्नावली व मुख्याध्यापकांसाठी व पालकांसाठी मुलाखत तंत्राचा वापर केला. संशोधन काळात निरीक्षण तंत्राचाही वापर करण्यात आला. मिळालेल्या माहीतीच्या आधारे टक्केवारी ने विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले व त्याआधारे खालील प्रमाणे निष्कर्ष व शिफारसी सुचविण्यात आल्या.

**संशाधनाचे निष्कर्श** :

(1) अमराठी विद्यार्थ्यांना मराठी माध्यमातून शिक्षण घेतांना 57% विद्यार्थ्यांना अडचणी आल्या.

(2) भाषा विषय प्रामुख्याने मराठी व नंतर इंग्रजी या विषयामध्ये 53% विद्यार्थ्यांत अध्ययन समस्या जाणवल्या.

(3) कौटुंबिक आर्थिक परीस्थितीचा विचार करता असे आढळले की दारीद्र्य रेषेखाली असल्यामुळे 78% विद्यार्थ्यांची कौटुंबिक परीस्थिती हलाखीची होती.

(4) 57% विद्यार्थ्याचे पालक आपल्या पाल्यांना आवश्यक त्या शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध करून देवू शकले नाही.

(5) 54% विद्यार्थ्यांना मुख्याध्यापकांशी व शिक्षकांशी जवळीक (Rapport) साधतांना आत्मविश्वासाची कमी जाणवली.

(6) शाळांमध्ये आयोजीत कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतांना 47% विद्यार्थ्यांना भाषेच्या समस्येमुळे बरेचदा अनेक अडचणी आल्या.

(7) 74% कुटूंबामध्ये या विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी पोषक वातावरण आढळले नाही.

(8) इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत या विद्यार्थ्यांचे गैरहजेरीचे प्रमाण 17% अधिक आढळून आले.

(9) या विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण 5% आढळून आले.

(10) 91% विद्यार्थ्यांना मराठी भाषा बोलतांना अडचणी जाणवल्या.

**शिफारसी** :

(1) मुख्याध्यापकांनी व शिक्षकांनी या विद्यार्थ्यांना वेगळे उद्‌बोधन करणे गरजेचे आहे.

(2) भाषा विषय जसे मराठी, इंग्रजी या विषयांच्या लेखन, वाचन उच्चारण सुधारणेसाठी भाषा विषयाच्या शिक्षकांनी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

(3) शिक्षकांनी या विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीची कारणे शोधून त्यावर समाधानकारक उपाय शोधने आवश्यक आहे.

(4) मुख्याध्यापकांनी या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी विशेष सभेचे आयोजन करून त्यांच्या पाल्यांसाठी कुटूंबात पोषक शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासंदर्भात उद्‌बोधन करावे.

(5) शाळांमध्ये घेतल्या जाणाऱ्या शालेय उपक्रमांत सांस्कृतिक कार्यक्रमात या विद्यार्थ्यांच्या सहभागाचे उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे.

(6) दारीद्र्य रेषेखालील विद्यार्थ्यांसाठी शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना पुरविण्याची जबाबदारी शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी पार पाडावी.

(7) शालेय प्रशासनातर्फे या विद्यार्थ्यांसाठी उपचारात्मक अध्यापनाची व्यवस्था करण्यात यावी जेणेकरून या विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास दुणावेल.

## संदर्भ

www.wekipedia.com
www.researchgate.net
www.tophat.com